रयत शिक्षण संस्थेचे,

# दहिवडी कॉलेज दहिवडी

## ग्रंथालय विभाग

### अहवाल

### २०२५-२६

ग्रंथालय हा महाविद्यालयाचा आत्मा आहे. लिखित साहित्य आणि त्याचे वाचन या विरहीत मनुष्य जीवन ही कल्पना करता येत नाही ज्ञानार्जनात सहाय्य करणे हे ग्रंथालयाचे आद्य कर्तव्य आहे. याची जाणीव ठेवून महाविद्यालयाचे ग्रंथालय कार्यरत आहे. ग्रंथसंपदा : आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील एकूण ग्रंथसंख्या ८९,३७४ इतकी आहे. चालू आर्थिक वर्षात एकूण १,३०६१८ किंमतीची ६४० ग्रंथांची भर पडली आहे. अजूनही ग्रंथांची खरेदी चालू आहे. ग्रंथालयात एकूण २५ नियतकालिके, ०५ वर्तमान उपलब्ध होत असल्याने प्राध्यापक व विद्यार्थी यांना आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी उपयोग होत आहे. बुक बँक योजनेचा लाभ गरीब व होतकरु २९२ विद्यार्थ्यांनी घेतला.ग्रंथालयाचा जास्तीत जास्त वाचकांना लाभ होण्यासाठी ग्रंथालयाने संगणकीकृत सेवा प्राध्यापक व विद्यार्थ्यांना करून देण्यात आली आहे. तसेच ग्रंथालयाचे पाच महाविद्यालयांच्या ग्रंथालयाबरोबर अंतर्गत देवाण-घेवाण योजनेची सभासदत्व घेऊन सदरची सुविधा ग्रंथालय सभासदांना करून देण्यात आली आहे.

वाचन संस्कृती जपण्यासाठी महाविद्यालयाच्या ग्रंथालयाने जवळपास असलेल्या विद्यालयातील प्राध्यापकांना ग्रंथालय सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. तसेच डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्म दिनानिमित्त १५ ऑक्टोबर हा 'वाचन संस्कृती दिवस' महाविद्यालयात साजरा करण्यात आला. शैक्षणिक चालू वर्षात तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. वाचन संस्कृतीला प्रेरणा मिळावी या उद्देशाने ग्रंथालयातर्फे उत्कृष्ट वाचक म्हणून दरवर्षी एका विद्यार्थ्याला व शिक्षकाला पुरस्कार दिला जातो.महाविद्यालयचे मा. प्राचार्य ग्रंथालय समितीचे चेअरमन व सर्व सदस्य यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळते.

ग्रंथपाल
दहिवडी कॉलेज, दहिवडी
ता. माण, जि. सातारा.

प्राचार्य
दहिवडी कॉलेज, दहिवडी
ता. माण, जि. सातारा